**<u>ठळक बातम्या</u>**

- देशात HMPV संसर्गाच्या ३ रुग्णांची नोंद, राज्यात एकही रुग्ण नसल्याचा सरकारचा निर्वाळा

- HMPV संसर्गाचा शेअर बाजारातही मोठा परिणाम, सेन्सेक्समधे साडे बाराशे अंकांची घसरण

- मस्साजोगच्या सरपंच हत्येप्रकरणी निःपक्षपाती तपासाची सर्वपक्षीय नेत्यांची राज्यपालांकडे  मागणी

**आणि**

- छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांनी केलेल्या भूसुरुंग स्फोटात ९ जवान शहीद

**<><><><><>**

देशातल्या ह्युमन मेटान्यूमो व्हायरस एचएमपीव्हीच्या एकूण रुग्णांची संख्या ३ झाली आहे. बेंगळुरूमध्ये ३ महिन्यांची मुलगी आणि ८ महिन्यांच्या मुलामधे, तर अहमदाबादमध्ये २ वर्षाच्या मुलात एचएमपीव्हीचा संसर्ग आढळला आहे. अहमदाबाद इथं मुलाला सर्दी-खोकल्याची लक्षणं, तर बेंगळुरूतल्या दोघांनाही ब्रॉन्कोन्यूमोनियाचा त्रास होता. तिघांचीही प्रकृती स्थिर असून बाधित रुग्णांपैकी कोणीही आंतरराष्ट्रीय प्रवास केलेला नाही.

राज्यात अद्याप या विषाणूचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही, असं आरोग्य विभागानं स्पष्ट केलं आहे. एचएमपीव्हीबाबत दक्षतेसह सर्दी-खोकल्याच्या रुग्णांचं सर्वेक्षण सुरु केलं असून खबरदारीचा उपाय म्हणून,

श्वसनविकाराच्या संसर्गापासून आपला बचाव करण्यासाठी नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी, असं आरोग्य विभागानं म्हटलं आहे. याविषयी लवकरच केंद्र सरकार दिशानिर्देश जारी करणार आहे. त्यांची अंमलबजावणी राज्यात करु, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं....

**होल्ड - फडनवीस**

एचएमपीव्ही हा नवा विषाणू नसून तो भारतातल्या फ्लू विषाणूचा भाग आहे, त्यामुळे बहुसंख्य भारतीय लोकांमध्ये याविरोधात प्रतिकारशक्ती निर्माण झालेली आहे, असं आरोग्य तज्ज्ञांनी सांगितलं. यामुळे गंभीर आजार होण्याची शक्यता कमी आहे. सामान्यत: एचएमपीव्हीच्या लक्षणांमध्ये खोकला, ताप, सर्दी आणि श्वास लागणं यांचा समावेश आहे. एचएमपीव्ही विषाणू सर्वप्रथम नेदरलँडस् मध्ये २००१ मध्ये आढळला होता.

**<><><><><>**

देशात HMPV विषाणूची बाधा झालेले रुग्ण आढळल्याचा विपरीत परिणाम देशातल्या शेअर बाजारांवरही आज झाला आणि दोन्ही निर्देशांक मोठ्या प्रमाणात आपटले. सेन्सेक्स १ हजार २५८ अंकांनी घसरुन ७७ हजार ९६५ अंकांवर बंद झाला. निफ्टी ३८९ अंकांनी घसरुन २३ हजार ६१६ अंकांवर स्थिरावला. सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या समभागांना आजच्या घसरणीचा मोठा फटका बसला. अमेरिकेच्या आर्थिक धोरणातले संभाव्य बदल, फेडरल रिझर्व्हची व्याजदर कपातीसंदर्भातली आक्रमक भूमिका, चलनवाढीच्या दरात वाढ होण्याची भिती यासारख्या कारणांनीही शेअर बाजार कोसळल्याचे विश्लेषकांचं मत आहे.

<><><><>

राज्याच्या लोकायुक्त कार्यालयानं २०२३ मधे ४ हजार ५५५ प्रकरणं निकाली काढली, तर वर्षअखेर ४ हजार ८१८ प्रकरणं प्रलंबित राहिली. राज्याचे लोक आयुक्त न्या. वि. मु. कानडे, आणि उप लोकआयुक्त संजय भाटिया यांनी आज राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची भेट घेऊन आपल्या कामकाजासंबंधीचा ५१ वा वार्षिक एकत्रित अहवाल  सादर केला. त्यात ही माहिती दिली आहे.

२०23 या अहवालाधीन वर्षात लोकायुक्त कार्यालयाकडे ४ हजार ७९० नवीन तक्रारी नोंदवण्यात आल्या. वर्षाच्या सुरुवातीला ४ हजार ५८३ प्रकरणं प्रलंबित होती. त्यामुळे २०23 मध्ये ९ हजार ३७३ प्रकरणं कार्यवाहीसाठी समोर होती, असं या अहवालात नमूद केलं आहे.

<><><><>

भाजपा- महायुती सरकारमध्ये पालकमंत्रिपदाबाबत कोणताही तिढा नसल्याचं महसूल मंत्री चन्द्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज सकाळी नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यानंतर बातमीदारांशी बोलताना त्यांनी सांगितलं की, उपमुख्यमंत्री अजित पवार परदेशात गेले होते, त्यामुळे पालकमंत्रिपदाबाबत चर्चा झाली नाही. या संदर्भात येत्या दोन दिवसांत निर्णय होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><>

राज्यसरकारच्या ४८५ सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देणारं ‘आपलं सरकार’ हे वेब पोर्टल अधिक अद्ययावत करण्याचे, तसंच  ‘आपलं सरकार’

चं मोबाईल ॲप तयार करण्याचे निर्देश माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी आज मुंबईत दिले. जम्मू काश्मीर, तमिळनाडू आणि कर्नाटक ही राज्ये ऑनलाईन सेवा देण्यात आघाडीवर आहेत. त्याचा अभ्यास करुन राज्य सरकारच्या अतिरिक्त 285 सेवा ऑनलाईन देण्याची तयारी माहिती तंत्रज्ञान विभागाने केली आहे.

**<><><><><>**

किमान आधारभूत किंमतींपेक्षा कमी दराने शेतमालाची खरेदी होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचना कृषी आयुक्त रावसाहेब भागडे यांनी कृषी पणन मंडळाला दिल्या आहेत. शेतमालाची एमएसपीपेक्षा कमी दराने खरेदी झाली तर शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांना संपर्क करण्याचे आवाहन त्यांनी केलं. शेतमालाच्या बाजार व्यवस्थापनाचे अचूक नियोजन करण्यासाठीच्या राज्यस्तरीय समन्वय समितीच्या बैठकीत ते पुण्यात बोलत होते. एमएसपी आणि प्रत्यक्ष बाजारभाव यांचे सनियंत्रण करण्यासाठीची यंत्रणा जिल्हा तसंच तालुका पातळीवर सक्रिय असावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी निःपक्षपाती तपासाची मागणी घेऊन सर्वपक्षीय नेत्यांच्या शिष्टमंडळाने आज मुंबईत राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची भेट घेतली. तपास पूर्ण होईपर्यंत मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा तसंच वाल्मिक कराड यांच्यावर

हत्येचा गुन्हा नोंदविला जावा तसेच तपास पथकात निष्पक्ष अधिकाऱ्यांचा समावेश करण्याची मागणी शिष्टमंडळानं केली.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणातल्या आरोपींच्या पोलीस कोठडीत न्यायालयानं वाढ केली आहे. विष्णू चाटे याची पोलीस कोठडीत चार दिवसांची तर जयराम चाटे, महेश केदार, आणि प्रतीक घुले याची पोलीस कोठडी न्यायालयानं १२ दिवसांनी वाढवली.

**<><><><><>**

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या विरोधात बीड, अंबाजोगाई, किल्ले धारूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. जरांगे यांच्या निषेधात केज पोलीस ठाण्यात ओबीसी कार्यकर्त्यांनी ठिय्या आंदोलन केलं.

**<><><><><>**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना समाजमाध्यमांद्वारे शिवीगाळ करत मारण्याची धमकी देणाऱ्या हितेश धेंडे याला ठाणे पोलिसांनी अटक केली आहे. धमकी दिल्याची कबुली त्यांनं पोलिसांना दिली.

**<><><><><>**

मुंबई महानगरातल्या हवेची गुणवत्ता बहुतांशी सुधारल्यामुळे भायखळा आणि बोरिवली पूर्व या भागांमध्ये बांधकामावर लावलेली सरसकट बंदी हटवण्यात आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी

यांनी ही माहिती दिली. प्रदूषण कमी करण्यासाठी काही दिवसांपूर्वी हे निर्बंध लादायचा निर्णय महानगरपालिकेनं घेतला होता. ते मागे घेतले असले, तरीही हवेच्या दर्जावर महानगरपालिकेचं अत्यंत बारीक लक्ष असणार आहे. महानगरपालिकेच्या मार्गदर्शक सूचनांचं पालन करणं प्रकल्प आणि विकासकांना बंधनकारक आहे. उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा आयुक्त गगराणी यांनी दिला आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांनी आज केलेल्या हल्ल्यात सुरक्षादलाचे ९ जवान शहीद झाले. बिजापूर जिल्ह्यात जवानांच्या गाडीवर वाहनांजवळ नक्षलवाद्यांनी भूसुरुंगाचा स्फोट घडवला. त्यात ८ जवान, वाहन चालक यांचा मृत्यू झाला. इतर ५ जण जखमी झाले. जखमींपैकी तिघांची प्रकृती चिंताजनक आहे. एक जवान बेपत्ता आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. या जवानांचं बलिदान वाया जाणार नाही, पुढच्यावर्षी मार्च पर्यंत देशाला नक्षलवाद मुक्त करण्याचा निर्धार पूर्ण करु, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे पहिलं मराठी नियतकालिक सुरु केलं तो ६ जानेवारीचा दिवस दरवर्षी मराठी पत्रकारिता दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त आज राज्यभरात विविध कार्यक्रम झाले.

लेखणीच्या माध्यमातून पत्रकारांनी सर्वसामान्य माणसाला न्याय देण्याचं सेवाव्रत कायम ठेवलं, असल्याचे प्रशंसोद्गार आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी यवतमाळ जिल्हा श्रमिक पत्रकार संघाच्या कार्यक्रमात काढले.

ओरोस इथं सिंधुदुर्ग जिल्हा पत्रकार संघातर्फे दिल्या जाणाऱ्या आदर्श पत्रकार पुरस्कारांचं वितरण झालं. राजकीय व्यक्ती आणि पत्रकार यांची संवादाची भूमिका राहिली पाहिजे, असं मत्स्य आणि बंदरे विकासमंत्री नितेश राणे यावेळी म्हणाले.

मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघानं २०२४ या वर्षीच्या उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारांची घोषणा केली. प्रतिष्ठेचा कृ. पां. सामक जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी यांना जाहीर झाला आहे. याशिवाय प्रगती पाटील, मंदार गोंजारी, राजन शेलार यांनाही इतर पुरस्कार जाहीर झाले.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात मध्य महाराष्ट्रात किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली, तर कोकण, मराठवाडा, आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किंचित वाढ झाली. सर्वात कमी किमान तापमान जळगाव इथं ११ अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//